# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. २२८३९९२४
ईमेल-sopr२.rdd-mh@nic.in

क्र. ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१८६ /पंरा-२
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
२५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक - ३ जुलै, २०१८.

प्रति,

१) जिल्हाधिकारी (सर्व)

२) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- उपसरपंचाच्या निवडणुकीमध्ये थेट निवडून आलेल्या सरपंचाच्या मतदानाच्या अधिकाराबाबत..

संदर्भ: १) सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१६, दि.१ सप्टेंबर, २०१७
२)शासनाचे पत्र क्र. ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१८६ /पंरा-२,दि.१ नोव्हेंबर, २०१७
३) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा याचिका क्र.२०९/२०१८ मधील दि.६.३.२०१८ चा निर्णय
४) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचा याचिका क्र.५९४९/२०१८ मधील दि.१५.६.२०१८ चा निर्णय

महोदय,

उपसरपंचाच्या निवडणुकीमध्ये थेट निवडून आलेल्या सरपंचाच्या मतदानाच्या अधिकाराबाबत, शासनाने संदर्भ क्र.२ येथील दि.१ नोव्हेंबर,२०१७ रोजी पत्र निर्गमित केले होते.

२. मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी विषयाधीन प्रकरणी संदर्भ क्र.३ व ४ अन्वये दिलेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, विषयाधीन प्रकरणाच्या अनुषंगाने शासनाचे संदर्भ क्र.२ येथील दि.१ नोव्हेंबर, २०१७ चे पत्र रद्द करण्यात येत आहे. संदर्भ क्र.१ येथील अध्यादेशातील तरतूदींनुसार उप-सरपंचाची निवडणूक ही ग्रामपंचायतीच्या वार्ड (प्रभाग) मधून निवडून आलेल्या सदस्यांमधून सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली होईल. या निवडणूकीच्या फेरीमध्ये सरपंच यांना मतदानामध्ये भाग घेता येईल. मात्र या फेरीतील उप-सरपंचाच्या निवडणूकीमध्ये समसमान मते पडल्यासच सरपंच यांना निर्णायक मत देण्याचा अधिकार आहे. तरी त्यानुसार उप-सरपंच निवडणूकीबाबत पुढील कार्यवाही करावी.

आपला,

03/07/18

(संतोष कराड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन